# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.02.2026** **वार:रविवार**

1. भारताने दहशतवाद्यांविरोधात कठोर कारवाई करून जगाला ठोस संदेश दिला असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. राज्यातील कसारा ते मनमाड रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका तर घोटी ते पालघर दरम्यान राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय
3. शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचा वापर करण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन
4. राज्यात सर्वत्र महाशिवरात्रीचा मोठा उत्साह आणि
5. क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात आज लढत

**मोदी सभा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाममधल्या गुवाहाटी इथं 5 हजार 450 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचे काल उद्घाटन केलं. तसंच देशभरातल्या चार शहरांसाठी पीएम-ईबस सेवा योजनेअंतर्गत 225 इलेक्ट्रिक बसगाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यामध्ये नागपूरमधल्या 50 बसगाड्यांचा समावेश आहे. यावेळी विजय संकल्प सभेत भाजप कार्यकर्त्यांशी मोदी यांनी संवाद साधला. ईशान्येकडील राज्यांचे सामर्थ्य हेच विकसित भारताचे बळ असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विरोधकांनी अनुनयाचं राजकारण करत दहशतवाद्यांना पाठीशी घातल्याची टीका करत, भारताने दहशतवाद्यांविरोधात कठोर कारवाई करून जगाला ठोस संदेश दिल्याचे पंतप्रधानांनी सांगितले.....

**नया भारत अपनी सुरक्षा के लिए हर तरह से तैयार हो रहा है। आज का भारत देश के दुश्मनों को नके घर में घुसकर जवाब भी देता है। आज ही पुलवामा हमले की बरसी है। मैं इस हमले में जान गंवाने वाले वीर सपूतों को नमन करता इस आतंकी हमले के बाद भारत ने जिस तरह। आतंकियों को सजा दी वो दुनिया ने देखा है अभी आपने भारत की ये शक्ति ऑपरेशन सिंदूर में भी देखी है।**

**मंत्रीमंडळ निर्णय**

केंद्र सरकारनं कसारा ते मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका तसंच घोटी ते पालघर दरम्यान राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा निर्णय घेतला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रीमंडळ बैठकीतल्या निर्णयांची माहिती काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. कसारा- मनमाड दरम्यानच्या रेल्वेच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेची लांबी 131 किलोमीटर असून 5 वर्षात 10 हजार 154 कोटी रुपये खर्चात हा प्रकल्प पूर्ण होऊ शकतो, असं ते म्हणाले. राष्ट्रीय महामार्ग 160 अ च्या घोटी-त्र्यंबक-पालघर या टप्प्याचं चौपदरीकरण करण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. यामुळं दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्गाशी जोडला जाणार आहे. 154 किलोमीटर लांबीच्या या मार्गासाठी 3 हजार 320 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

**नैसर्गिक शेती**

रासायनिक खतांमुळे कमी होत असलेल्या उत्पादकतेच्या पार्श्वभूमीवर सर्व शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचा वापर करावा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते काल परळी इथं आयोजित महापशुधन एक्स्पो 2026 प्रदर्शनात पशुपालकांशी संवाद साधताना बोलत होते. भारत-अमेरिका यांच्या व्यापार कराराच्या मुद्द्यावर कृषी बाजारपेठ खुली केली नसल्याचं सांगताना फडणवीस म्हणाले......

**आमची बाजारपेठ ही आम्ही तुमच्याकरता खुली करणार नाही. कुठलीही बाजारपेठ आपली कृषीची खुली केलेली नाही. आपल्याकडे कोणीही स्वस्त माल आणून आपल्या शेतमालाचे भाव पाडू शकणार नाही. पण काही नतद्रष्ट लोकं अशी आहेत की आमच्या सोयाबीनला चांगला भाव मिळायला लागला होता. दोन चार दिवसापूर्वी अफवा दिली सोडून ती आता अमेरिकेच सोयाबीन भारतात येणार आहे पाचशे रुपयांनी सोयाबीनचे भाव पाडले मी सोयाबीनच्या शेतकऱ्यांना सांगतो आणि मार्केट मध्येही सांगतो असं कुठलंही आपल्या करारात लिहिलेलं नाही कुठलंही सोयाबीन बाहेरून येणार नाही आणि जोपर्यंत शेतकऱ्यांचं हित बघणारं सरकार आहे. तोपर्यंत आपल्या शेतकऱ्यांचं अहित होईल अशा प्रकारचा कुठलाही निर्णय आपण घेणार नाही.**

उत्तम रोजगार निर्मिती करण्यासाठी शेतीला जोड व्यवसाय आवश्यक असून राज्यातला शेती विकास आणि उत्पादकता वाढवण्यासाठी 500 कोटी रुपयांचं मिशन राबवण्यात येत असल्याचंही त्यांनी सांगितलं. शेती पुन्हा फायदेशीर करण्यासाठी आणि पशुधन सुरक्षित करण्यासाठी वैरण विकास उपक्रम हाती घेतला जाणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. फडणवीस यांच्या उपस्थितीत शासनाच्या विविध संस्थादरम्यान भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानासाठी सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी दिली.

**फळबाग**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत हर्बालाइफ आणि 'फार्मर्स फॉर फॉरेस्ट' यांच्यात 305 एकरांवर फळबाग आणि देशी वृक्षलागवडीसाठी दीड कोटींचा करार झाला आहे. बीड आणि पुणे जिल्ह्यांत हा प्रकल्प राबवला जाणार आहे. जैवविविधतेचे क्षेत्र वाढविणे आणि शेतकऱ्यांना दीर्घकालीन उत्पन्न देणारी फळबाग आणि वृक्षलागवड करण्यास प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे. हा उपक्रम मातीची सुपीकता वाढविणे, कार्बन शोषण क्षमता वाढविणे तसेच स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण करण्यास उपयुक्त ठरणार आहे. फळ उत्पादनातून मिळणाऱ्या उत्पन्नासोबतच कार्बन क्रेडिटच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा पर्यायी स्रोत उपलब्ध होणार आहे.

**महिला सुरक्षा-नाशिक**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर मध्ये सिंहस्थ कुंभमेळ्यात देशभरातून दाखल होणाऱ्या महिला भाविकांच्या सुरक्षीततेसाठी सर्वोच्च उपाययोजना करण्याचे निर्देश विधान परीषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिले आहेत. गोऱ्हे यांनी नाशिक परीक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयात काल नाशिक विभागाची बैठक घेतली त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या.

**रमणबाग**

पुण्यातल्या न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत सक्षम प्रकल्पांतर्गत शिक्षक प्रीतम जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ई-कॉमर्स संकेतस्थळाचे उद्घाटन काल करण्यात आले. या उपक्रमातून शिक्षणासोबत कौशल्यविकास, उद्योजकता आणि डिजिटल व्यवहारज्ञानाचे महत्त्व अधोरेखित झाले. या उपक्रमाबद्दल प्रशालेतील विद्यार्थी चिन्मय मराठे आकाशवाणीशी बोलताना म्हणाला....

**ही वेबसाईट डिझाइन करताना सुरुवातीला वयाच्या मर्यादा, पेमेंट गेटवे ह्या अनेक अडचणी आल्या पण आम्ही खूप रिसर्च करून त्याचे पर्यायही शोधले. आम्ही ऑप्लिटेक्स हा ई कॉमर्स क्लोथिंग ब्रँड सुरू केला. यातून ग्राहक आम्ही डिझाइन केलेले सगळ्या प्रकारचे कपडे जसं की टी शर्ट्स, हुडीज इत्यादी ऑनलाईन स्टोअर मार्फत मागू शकतात. या उपक्रमात मी, वेबसाईट तयार करणे, डोमेन आणि इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्थापन, पेमेंट इंटिग्रेशन काम पाहतो. आयुष बोबडे हा माझा मित्र यांनी रेझर पेची व्यवस्था केली आहे, तर अवधूत भिडे या मित्राने आर्थिक व्यवहाराचे वितरण आणि प्राथमिक मार्केटिंगची जबाबदारी सांभाळलेली आहे. हा उपक्रम आमच्यासाठी शिक्षणासोबतच व्यवसाय करताना प्रत्यक्ष अनुभव घेण्याची एक महत्त्वाची संधी आहे.**

**महाशिवरात्री**

महाशिवरात्रीनिमित्त राज्यात विविध शिवमंदिरांमधे भाविकांनी पहाटेपासून मोठी गर्दी केली आहे. त्याचबरोबर ठीकठिकाणी विशेष पूजा, अभिषेक, रुद्र पाठ, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाबरोबरच मंदिर परिसरात विद्युत रोषणाई तसंच आकर्षक सजावट करण्यात आली करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती सांभाजीनगर जवळील घृष्णेश्वर मंदिर परिसरात काल महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. लातूर मधल्या डॉ. भालचंद्र रक्तपेढीच्या वतीने देवस्थान परिसरात आज रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं असून रक्तदात्याला थेट दर्शनाचा लाभ देण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर मंदिर मात्र दुरुस्तीच्या कारणास्तव भाविकांना दर्शनासाठी बंद राहणार आहे.

**युवामहोत्सव-सोलापूर**

मैसूर इथं आयोजित करण्यात आलेल्या 39 व्या दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सव-2026 मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने एकंदर 13 पारितोषिके पटकावली आहेत. 9 ते 13 फेब्रुवारी या कालावधीत झालेल्या या महोत्सवात कर्नाटक, महाराष्ट्र आणि गोवा या राज्यातल्या एकंदर 36 विद्यापीठांचा सहभाग होता.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल कोलंबो इथं झालेल्या सामन्यात आयर्लंडने ओमानवर 96 धावांनी विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने स्कॉटलंडचा 5 गडी राखून पराभव केला. तर दक्षिण आफ्रिका संघाने न्यूझीलंडचा 7 गडी राखून पराभव केला. आज कोलंबो इथं पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान समोरासमोर येणार आहेत. कोलंबोमधल्या फिरकीला अनुकूल खेळपट्टी पाहता, भारत, पाकिस्तानविरुद्ध तीन फिरकीपटू मैदानात उतरवण्याची शक्यता आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होणार आहे.

**हवामान**

राज्यात बहुतांश ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत थोडी वाढ झाली आहे. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

## या बरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.